मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिका हद्दवाढीबाबत मुख्यमंत्र्यांना साकडे!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांची मागणी : स्वयंसेवी संस्था, लोकप्रतिनिधींची बैठक घ्या

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दवाढ, तसेच चाकण, आळंदी आणि राजगुरुनगर या नगरपरिषदांचा समावेश करून स्वतंत्र महापालिका स्थापनेबाबत सविस्तर चर्चा करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी आणि शहर विकास क्षेत्रातील तज्ज्ञांसोबत बैठक घ्यावी, अशी मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.

यासंदर्भातील अधिकृत पत्र मुख्यमंत्री फडणवीस यांना पाठवले असून, संबंधित भागातील स्वयंसेवी संस्था, स्थानिक लोकप्रतिनिधी, तज्ज्ञ अधिकारी आणि नागरी संघटनांसोबत सविस्तर सल्लामसलत होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

आमदार लांडगे यांनी पत्रात नमूद केले आहे की, हिंजवडी,




माण, मारुंजी, जांबे, नेरे, सांगवडे व गहुंजे या सात गावांचा पिंपरी-चिंचवड महापालिकेत समावेश करण्यास राज्य सरकारने अनुकूलता दर्शविल्याची माहिती प्रसारमाध्यमांतून समोर आली आहे. आयटी कंपन्यांचा मोठा जमाव, वाढती लोकसंख्या, आणि मुलभूत सुविधांचा अभाव ही स्थिती लक्षात घेता या भागाचा पालिकेत समावेश अत्यावश्यक आहे. तसेच, आयटी कर्मचाऱ्यांच्या वतीने #UNCLOG HINJAWADIITPARK ही स्वाक्षरी मोहीम देखील सुरू करण्यात आली असून, हिंजवडी व परिसराच्या समावेशाची मागणी अधिक तीव्र झाली आहे.

दुसरीकडे, पिंपरी-चिंचवड महापालिकेने आपल्या अहवालात स्पष्ट केले आहे की, सध्या क्षेत्रफळ वाढल्यामुळे महापालिकेवर सेवा पुरवठ्याचा ताण वाढला आहे. त्यामुळे चाकण, आळंदी व राजगुरुनगर या नगरपरिषदांचा स्वतंत्र महापालिका म्हणून विकास करण्यास हरकत नाही, असे मत महापालिकेने शासनास कळवले आहे. "हा संपूर्ण परिसर PMRDA च्या हद्दीत असून, त्याचे अध्यक्ष म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे कार्यरत आहेत. त्यांच्या नेतृत्वात पिंपरी-चिंचवड आणि पुणे परिसर शाश्वत विकासाचे रोल मॉडेल बनू शकतो," असा विश्वासही आमदार लांडगे यांनी व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर, महापालिका हद्दवाढ आणि नवीन महापालिकेच्या स्थापनेबाबत सविस्तर बैठक लवकरच आयोजित व्हावी, अशी नम्र विनंती आमदार लांडगे यांनी आपल्या पत्राद्वारे केली आहे.

> "पिंपरी-चिंचवड परिसराचा झपाट्याने होणारा विस्तार, वाढती लोकसंख्या, आयटी कंपन्यांची वाढती संख्या, आणि नागरिकांच्या मूलभूत गरजांची वाढती मागणी पाहता, नियोजनबद्ध विकासासाठी महापालिका हद्दवाढीचा निर्णय अत्यावश्यक आहे. हिंजवडी आणि आजूबाजूच्या गावांचा महापालिकेत समावेश झाल्यास विकासाला गती मिळेल आणि नागरिकांना शासकीय सुविधा अधिक सुलभपणे मिळतील. तसेच, चाकण, आळंदी आणि राजगुरुनगर या नगरपरिषदांचा स्वतंत्र महापालिकेत समावेश झाल्यास, त्या परिसराचाही सर्वांगीण विकास शक्य होईल. मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या विषयावर स्वयंसेवी संस्था, लोकप्रतिनिधी आणि तज्ज्ञांबरोबर सविस्तर चर्चा करण्यासाठी बैठक घेण्याची विनंती केली आहे. या बैठकीत सर्व संबंधितांचे मत जाणून घेऊन योग्य दिशा आणि निर्णय होईल, असा विश्वास आहे.
>
> **- महेश लांडगे,आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# महिलांच्या आरोग्यासह सक्षमीकरणासाठी महिला शहराध्यक्षांचा पुढाकार

## महिला सशक्तीकरणासाठी एक पाऊल पुढे : प्रा. कविता अल्हाट यांचा उपक्रम

**पिंपरी | प्रतिनिधी**

महिला सशक्तीकरणासाठी एक पाऊल पुढे ! या उपक्रमा अंतर्गत राष्ट्रवादीच्या महिला शहराध्यक्षा प्रा. कविता आल्हाट यांनी पुढाकार घेतला आहे. परिसरातील महिलांच्या आऱोग्यासाठी विविध प्रकारचे शिबिर आणि सक्षमीकरणासाठी विविध प्रकारचे प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले. या उपक्रमाला परिसरातील महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

प्रत्येक महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहणे आवडते. स्वतःच्या कर्तत्वाने चार पैसे कमवावे असे अऩेकींचे स्वप्न असते. त्यासाठी योग्य मार्गदर्शन आवश्यक असते. अऩ्यथा अनेक महिला छोटे-मोठे व्यवसाय सुरु करतात आणि ते बंद ही होतात. योग्य निर्णय आणि योग्य मार्गदर्शन मिळाल्यास व्यवसायात यशस्वी व्हायला वेळ लागत नाही. व्यवसाय सुरु करताना काय केले पाहिजे, कुठला व्यवसाय निवडला पाहिजे, डिजिटल मार्केटींग कसे केले पाहिजे, इथपासून मार्केट कसे शिकायचे इथपर्यंत सर्व



गोष्टींचे मार्गदर्शन महिलांना देण्यात आले. या प्रशिक्षण शिबिरामध्ये रूचकर आणि पौष्टीक खाद्यपदार्थ, मोदक आणि विविध प्रकारचे केक याबाबत प्रशिक्षण देण्यात आले.

कुटूंबांची जबाबदारी सांभाळताना महिला सर्वप्रथम स्वतःच्या आऱोग्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. ज्यामध्ये कर्करोग तपासणी, डोळे तपासणी इतर आरोग्य तपासणी करण्यात आल्या. तसेच आरोग्याबाबत डॉक्टरांकडून मार्गदर्शन करण्यात आले.

> महिला सशक्तीकरणासाठी एक पाऊल पुढे! हा उपक्रम राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे आयोजित असून, माझ्या परिसरातील महिलांसाठी हा उपक्रम आपण घेतला आहे. महिला सक्षमीकरण कार्यशाळा ही स्त्रियांचे हक्क, आत्मविश्वास आणि नेतृत्वक्षमतेला नवी दिशा देणारे हे मार्गदर्शन सत्र अनेक महिलांसाठी प्रेरणादायी असणार आहे. तसेच आरोग्याबाबत जनजागृती आणि काळजी, तपासणी शिबिर घेण्यात आले. या उपक्रमास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.
>
> **- प्रा. कविता आल्हाट, शहराध्यक्ष-राष्ट्रवादी महिला काँग्रेस पार्टी, पिंपरी-चिंचवड.**

# एकमजली घराला चार मजल्यांचा कर!

## महापालिकेच्या मिळकतकर विभागाचा अजब कारभार, साडेसतरा लाख न भरल्यास जप्ती

**पुणे | प्रतिनिधी**

एकमजली बांधकामाला महापालिकेने चार मजल्यांचा मिळकतकर आकारण्याचा अजब कारभार केला आहे. हा मिळकतकर आता ४३ लाखांच्या घरात गेला आहे. घरमालकाने पाच वर्षे हेलपाटे मारल्यानंतर अखेर करामध्ये दुरुस्ती करण्याची तयारी प्रशासनाने दाखविली. मात्र, त्यासाठी आधी १७ लाख ५० हजार रुपये भरा आणि त्यानंतर मिळकतकरात दुरुस्तीचे बिल घ्या, असा पवित्रा महापालिका प्रशासनाने घेतला आहे. महपालिकेच्या या निर्णयामुळे सुतारकाम करणारा हा जागामालक हतबल झाला आहे.




मुंढवा भागातील शिर्के रस्त्यावर राहत असलेल्या सुरेश सरवदे यांना महापालिकेने हा साडेसतरा लाख रुपयांचा मिळकतकर भरण्यास सांगितले आहे. या भागात सरवदे यांनी दीड गुंठा जागा विकत घेऊन त्यावर अंदाजे १३०० चौरस फुटांचे बांधकाम केले. हे बांधकाम एक मजल्याचे आहे. या बांधकामाला मिळकतकर लावावा, असा अर्ज सरवदे यांनी महापालिकेकडे केला. त्या वेळी मिळकतकर विभागाने चार मजल्यांच्या बांधकामाची नोंद करून त्यांना मिळकतकराचे बिल पाठविले. हा कर जास्त असल्याने सरवदे यांनी तो भरलाच नाही. त्यानंतर २०१७ मध्ये मिळकतकर न भरल्याने त्यांना महापालिकेने साडेपाच लाख रुपयांचे बिल पाठविले.

बांधकाम केवळ एक मजल्याचे असताना चार मजल्यांचे बिल कसे भरू, अशी विचारणा करून जागामालक सरवदे यांनी महापालिकेकडे मिळकतकरात दुरुस्ती करावी, यासाठी अर्ज सादर केला. महापालिकेच्या ढोले पाटील रोड क्षेत्रीय कार्यालयात जाऊन संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला. इतकेच नव्हे, तर संबंधित अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष जागेवर नेऊन त्यांना बांधकामदेखील दाखविले. त्यानंतर यामध्ये दुरुस्ती करण्याचे आश्वासन संबंधित जागामालकाला देण्यात आले होते.

> “एका मजल्याच्या घरासाठी चार मजल्यांचा मिळकतकर लावल्याची तक्रार संबंधित व्यक्तीने केली आहे. वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी गुरुवारी तक्रारदार, तसेच त्या विभागातील संबंधित अधिकाऱ्यांना बोलाविण्यात आले आहे. कागदपत्रांची तपासणी करून पुढील निर्णय घेतला जाईल.
>
> **– अविनाश सकपाळ, उपायुक्त, मिळकतकर विभाग, पुणे महापालिका.**

तीन महिन्यांपूर्वी ढोले पाटील रोड क्षेत्रीय कार्यालयातील मिळकतकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी ४३ लाख १० हजार ३१२ रुपयांची थकबाकी असून, क्षेत्रफळ दुरुस्ती करून अंदाजे १७ लाख ५० हजार रुपयांचे बिल भरा, त्यानंतर त्यामध्ये आवश्यक ती दुरुस्ती करून बिल दिले जाईल, असे पत्र दिले.

घराचे संपूर्ण बांधकाम करण्यासाठीही इतका खर्च झाला नाही, तेवढा मिळकत कर भरा, अन्यथा जप्ती येईल, असे महापालिकेतील अधिकारी सांगत असल्याने महापालिकेच्या या कारभारापुढे जागामालक सरवदे हतबल झाले आहेत. या बिलामध्ये दुरुस्ती करून मिळावी, असा अर्ज सरवदे यांनी मिळकतकर विभागाचे उपायुक्त अविनाश सकपाळ यांच्याकडे केला आहे.

---

# देशात परवडणाऱ्या घरात पुण्याचा दुसरा क्रमांक

## परवडणाऱ्या घरांमध्ये चेन्नई चौथ्या स्थानी, बंगळुरु पाचव्या स्थानी, तर मुंबई सर्वांत शेवटी

**पुणे | प्रतिनिधी**

रिझर्व्ह बँकेने व्याजदरात कपात केल्याने देशातील महानगरांमध्ये परवडणाऱ्या घरांची उपलब्धता वाढली आहे. देशात यंदा पहिल्या सहामाहीत सर्वाधिक परवडणारी घरे गुजरातमधील अहमदाबाद शहरात आहेत. त्या खालोखाल पुण्याचा दुसरा क्रमांक असून, मुंबईतील घरे सर्वाधिक महाग असल्याने या शहराचा शेवटचा क्रमांक लागला आहे.



घरगुती उत्पन्नाच्या तुलनेत गृहकर्जाच्या मासिक हप्त्याच्या गुणोत्तरावरून परवडणारी घरे असलेल्या शहरांची क्रमवारी नाइट फ्रँक इंडियाने जाहीर केली आहे. यात देशातील मुंबई, पुणे, दिल्ली, कोलकाता, बंगळुरू, हैदराबाद, चेन्नई आणि अहमदाबाद या शहरांचा समावेश आहे. यानुसार, देशात सर्वाधिक परवडणारी घरे अहमदाबादमध्ये आहेत. तिथे घरगुती उत्पन्नाच्या तुलनेत गृहकर्जाच्या मासिक हप्त्याचे प्रमाण १८ टक्के आहे. यात पुणे दुसऱ्या आणि कोलकाता तिसऱ्या क्रमांकावर आहे. तिथे घरगुती उत्पन्नाच्या तुलनेत गृहकर्जाच्या मासिक हप्त्याचे प्रमाण अनुक्रमे २२ टक्के आणि २३ टक्के आहे.

देशात परवडणाऱ्या घरांमध्ये मुंबईचे स्थान शेवटचे आहे. मुंबईत घरगुती उत्पन्नाच्या तुलनेत गृहकर्जाच्या मासिक हप्त्याचे प्रमाण ४८ टक्के आहे. असे असले, तरी मुंबईत प्रथमच घरगुती उत्पन्नाच्या तुलनेत मासिक हप्त्याचे प्रमाण ५० टक्क्यांच्या खाली आले आहे. घरगुती उत्पन्नाच्या तुलनेत मासिक हप्त्याचे प्रमाण जेवढे कमी असेल, तेवढी घरे जास्त परवडणारी असतात.

परवडणाऱ्या घरांमध्ये चेन्नई चौथ्या स्थानी, बंगळुरू पाचव्या स्थानी, दिल्ली सहाव्या स्थानी आणि हैदराबाद सातव्या स्थानी आहे. या चारही शहरांमध्ये घरगुती उत्पन्नाच्या तुलनेत गृहकर्जाच्या मासिक हप्त्याचे प्रमाण ३० टक्क्यांपर्यंत आहे. दिल्लीवगळता सर्वच महानगरांमध्ये घरगुती उत्पन्नाच्या तुलनेत मासिक हप्त्याचे प्रमाण डिसेंबर २०२४ अखेर संपलेल्या तिमाहीपेक्षा कमी झाले आहे, असे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

> “देशात नागरिकांच्या उत्पन्नात होणारी वाढ आणि अर्थव्यवस्थेच्या भक्कम स्थितीमुळे ग्राहकांमध्ये वित्तीय आत्मविश्वास वाढत आहे. त्यातून घर खरेदी करण्याची दीर्घकालीन गुंतवणूक ग्राहक करीत आहेत. रिझर्व्ह बँकेने चालू आर्थिक वर्षासाठी सकल देशांतर्गत उत्पादनाचा ६.५ टक्क्यांचा अंदाज वर्तविला आहे. तसेच, व्याजदरात कपात झाल्याने आगामी काळात परवडणारी घरे जास्त प्रमाणात उपलब्ध होतील.
>
> **- शिशिर बैजल, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, नाइट फ्रँक इंडिया.**

### परवडणारी घरे कशी ठरवितात?

**» परवडणारी घरे ठरविताना त्या शहरातील घरांची सरासरी किंमत विचारात घेतली जाते. त्यातील ८० टक्के गृहकर्ज रक्कम आणि कर्जाची मुदत २० वर्षे धरून मासिक हप्ता निश्चित केला जातो. त्या शहरात एका कुटुंबाला सरासरी घरगुती उत्पन्नापैकी किती टक्के रक्कम मासिक हप्त्यासाठी द्यावी लागते, त्यावरून परवडणारी घरे ठरविली जातात. सर्वसाधारणपणे उत्पन्नाच्या तुलनेत गृहकर्जाचा मासिक हप्ता ४० टक्के असावा. हा हप्ता उत्पन्नाच्या तुलनेत ५० टक्क्यांवर गेल्यास बँकाही गृहकर्ज देणे टाळतात.**

# पूरस्थिती हाताळण्यासाठी महापालिका यंत्रणा सज्ज

## पिंपरी चिंचवड परिसरात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण होण्याचा धोका

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड परिसरात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण होण्याचा धोका आहे. त्या स्थितीवर त्वरित प्रतिसाद देण्यासाठी महापालिकेची यंत्रणा सज्ज आहे, असे अधिकार्यांनी सांगितले.

महापालिकेच्या सर्व आठ क्षेत्रीय कार्यालय स्तरावरील नियंत्रण कक्ष 24 बाय 7 सुरू आहेत. तीन शिफ्टमध्ये पथके नियुक्त करण्यात आली आहेत. पाण्याचा वाढ होण्याची शक्यता असलेले संवेदनशील भाग ओळखून तिथे जलद प्रतिसाद पथके तैनात करण्यात आली आहेत. ही पथके पंप, बचाव साहित्य आणि आवश्यक मनुष्यबळाने सज्ज आहेत.

अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापन विभागाने विविध क्षेत्रीय कार्यालयांमध्ये पंधराहून अधिक बचाव बोटी आणि दोनशे लाईफ जॅकेट सज्ज ठेवली आहेत. पवना आणि इंद्रायणी नद्यांलगत असलेल्या पूरग्रस्त भागांवर विशेष लक्ष ठेवण्यात आले आहे.

सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने, महापालिकेच्या आरोग्य पथकांना पाण्याद्वारे पसरणार्या रोगांवर लक्ष ठेवण्यासाठी सज्ज ठेवण्यात आले आहे. संवेदनशील भागात निर्जंतुकीकरणाच्या उपाययोजना करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

तात्पुरत्या निवार्यांची देखील नोंद घेण्यात आली आहे. पाणीपुरवठा व विद्युत विभाग भूमिगत आणि उघड्या पायाभूत सुविधांवर लक्ष ठेऊन आहेत. नागरिकांनी वेळोवेळी सूचनांवर लक्ष ठेऊन सहकार्य करावे व जागरूक राहावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

महापालिकेच्या अधिकृत सोशल मीडिया चॅनेल्सवर वेळोवेळी लक्ष ठेवावे. पाणी साचणे, झाडे पडणे किंवा वीजविषयक तक्रारी असल्यास लगेच नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा. महापालिकेने संभाव्य स्थितीचा विचार करून योग्य ती नियोजनबद्ध तयारी केली आहे. नागरिकांनी सतर्क राहून जवळच्या नियंत्रण कक्षाशी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.




### साचलेल्या पाण्यात जाणे टाळावे

» पाणी साचलेल्या ठिकाणी जाणे टाळावे. महापालिकेच्या अधिकृत सोशल मीडिया चॅनेल्सवर वेळोवेळी लक्ष ठेवावे. पाणी साचणे, झाडे पडणे किंवा वीजविषयक तक्रारी असल्यास लगेच नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा. महापालिकेने संभाव्य स्थितीचा विचार करून योग्य ती नियोजनबद्ध तयारी केली आहे. नागरिकांनी सतर्क राहून जवळच्या नियंत्रण कक्षाशी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.

> शहरापासून नजीक असणारे पर्यटन स्थळ म्हणून सध्या भुलेश्वर मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर भाविकांचा व पर्यटकांचा ओढा असल्याने त्यादृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना होणे गरजेचे आहे. शासन स्तरावर व जिल्हा परिषदेकडे माळशिरस ग्रामपंचायत सातत्याने यासाठी पाठपुरावा करत आहे.
>
> **- आरती यादव, सरपंच, माळशिरस**

### क्षेत्रीय कार्यालयनिहाय नियंत्रण कक्ष

» अ क्षेत्रीय कार्यालय - 9922501454, ब क्षेत्रीय कार्यालय - 9922501455, क क्षेत्रीय कार्यालय - 9922501457, ड क्षेत्रीय कार्यालय - 9922501459, ई क्षेत्रीय कार्यालय - 8605722777, फ क्षेत्रीय कार्यालय - 8605422888, ग क्षेत्रीय कार्यालय - 7887879555, ह क्षेत्रीय कार्यालय - 9130050666

# ऐन पावसाळ्यात सदनिकाधारकांना द्यावे लागते पाणी टंचाईला तोंड

## मोशी आणि परिसरात गेली तीन ते चार दिवस विद्युत पुरवठा वारंवार खंडित होत आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

यावर्षी मान्सूनने दमदार हजेरी लावली आहे. पिंपरी चिंचवड शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या पवना धरणात पन्नास टक्के पाणी साठा झाला आहे. त्यामुळे शहरात सर्वच भागात सुरळीत पाणी पुरवठा होणे अपेक्षित होते; मात्र मोशी आणि परिसरात गेली तीन ते चार दिवस विद्युत पुरवठा वारंवार खंडित होत आहे. त्याचा परिणाम पाणी पुरवठ्यावर होत असल्याने त्याचा फटका सदनिकाधारकांना बसत आहे.

मान्सून सुरू होण्या अगोदर बहुतांशी गृहप्रकल्पात पाणी पुरवठा करण्यास महापालिका पाणी पुरवठा विभागाला अडचणी निर्माण झाल्या होत्या. पवना धरणात पाणी साठा कमी झाला होता. त्यामुळे परिसरातील गृहप्रकल्पात टँकर चा आधार घ्यावा लागत होता. एक दिवस आड पाणी पुरवठा होऊन ही पाणी कमी पडत होते. त्यामुळे पाणी पुरवठा विभागाला त्याचे नियोजन करताना तारेवरची कसरत करावी लागत होती. मात्र मान्सूनपूर्व पावसाने दमदार हजेरी लावली. त्यानंतर मान्सून चा पाऊस सुरू झाला. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या पवना धरण आज मातीस पन्नास टक्के पेक्षा जास्त भरले आहे. त्यामुळे यापुढचे सहा महिने तरी शहराला पाणी कमी पडणार नसल्याने शहरासह मोशी परिसरातील सदनिकाधारकांनी सुटकेचा निःश्वास सोडला होता.

धरणात पुरेसा पाणी साठा असताना या भागात गेली तीन ते चार दिवस विद्युत पुरवठा खंडित होत आहे. त्याचा परिणाम महापालिका पाणी पुरवठा करणाऱ्या यंत्रणेवर पडत आहे. त्यामुळे कधी सकाळी, कधी दुपारी तर कधी सायंकाळी पाणी पुरवठा करावा लागत असल्याने सदनिकाधारकांचा पाण्याच्या नियोजनाचा बट्ट्याबोळ निर्माण झाला आहे. त्याचा अप्रत्यक्षरित्या त्रास सदनिकाधारकना सहन करावा लागत आहे.



> महापालिका पाणी पुरवठा विभागाकडून पाणी वाटपाचे वेळापत्रक बदलले आहे. त्याचा फटका सदनिकाधारकांना बसत आहे. त्याबाबत विद्युत पुरवठा यांना संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता पावसाळी कामे सुरू आहेत. एक दोन दिवसात या अडचणी कमी होतील असे उत्तर देण्यात येत आहेत.
>
> **- योगेश पाटील, चेअरमन पी. ग्रीन हौसिंग सोसायटी, मोशी**

> याबाबत माहिती घेतो, विद्युत पुरवठा खंडित होत असेल तर तो सुरळीत करण्याच्या दृष्टीने आदेश देण्यात येतील.नागरिकांना होणारा त्रास कमी करण्यासाठी निश्चित पावले उचलली जातील.
>
> **- अतुल देवकर, कार्यकारी अभियंता, भोसरी**

# आनंदाची बातमी ! कळमोडी धरण 100% भरले

## जिल्ह्यातील पूर्ण क्षमतेने भरलेले हे पहिले धरण ठरले, या धरणातून सांडव्यावरून पाण्याचा अनियंत्रित विसर्ग आरळा नदीत सुरू झाला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

खेड तालुक्यातील कळमोडी धरण दुपारी 100 टक्के भरले असून, पुणे जिल्ह्यातील पूर्ण क्षमतेने भरलेले हे पहिले धरण ठरले आहे. 1.5 टीएमसी पाणीसाठा क्षमता असलेल्या या धरणातून सांडव्यावरून पाण्याचा अनियंत्रित विसर्ग आरळा नदीत सुरू झाला आहे.

खेड तालुक्यात कळमोडी, चासकमान आणि भामा आसखेड ही तीन धरणे आहेत. यापैकी कळमोडी धरण २०१० पासून पूर्ण क्षमतेने भरण्यास सुरुवात झाली. दरवाजाविरहित असलेल्या या धरणातून पाणी सांडव्यावरून वाहते. खरपूड, वरचे भोमाळे आणि भीमाशंकर डोंगररांगेत मागील आठवड्यात झालेल्या जोरदार पावसामुळे आरळा नदीला पूर आल्याने धरणाचा पाणीसाठा झपाट्याने वाढला. गेल्या दोन दिवसांत पावसाचे प्रमाण कमी झाले असले तरी, धरण परिसरातील सातत्यपूर्ण पावसाने कळमोडी धरण पूर्ण भरले.

कळमोडी धरण दरवाजाविरहित असल्याने सांडव्यावरून अनियंत्रित पाण्याचा विसर्ग आरळा नदीत सुरू आहे. नदीकाठच्या गावकऱ्यांना नदीपात्राजवळ जाण्यापासून परावृत्त करण्यात आले आहे. तसेच, जनावरे किंवा साहित्य नदीपात्रात असल्यास तातडीने हलवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत खेड तालुक्यातील पश्चिम भागात पडणाऱ्या पावसामुळे भीमा, भामा आणि आरळा नद्यांना पूर आल्याने चासकमान आणि भामा आसखेड धरणांच्या पाणी पातळीतही वाढ होत आहे

कळमोडी धरण २०१० पासून पूर्ण क्षमतेने भरण्यास सुरुवात झाली. दरवाजाविरहित असलेल्या या धरणातून पाणी सांडव्यावरून वाहते. खरपूड, वरचे भोमाळे आणि भीमाशंकर डोंगररांगेत मागील आठवड्यात झालेल्या जोरदार पावसामुळे आरळा नदीला पूर आल्याने धरणाचा पाणीसाठा झपाट्याने वाढला.



### सावधगिरीचा इशारा

» कळमोडी धरण दरवाजाविरहित असल्याने सांडव्यावरून अनियंत्रित पाण्याचा विसर्ग आरळा नदीत सुरू आहे. नदीकाठच्या गावकऱ्यांना नदीपात्राजवळ जाण्यापासून परावृत्त करण्यात आले आहे. तसेच, जनावरे किंवा साहित्य नदीपात्रात असल्यास तातडीने हलवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ग्रामपंचायतींना सतर्क राहण्याचे निर्देश चासकमान पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता मो. ता. जाधवर यांनी दिले आहेत.

### चासकमान धरण

- एकूण पाणीपातळी: ६३९.३२ दशलक्ष घनमीटर
- एकूण साठा: १००.९० दशलक्ष घनमीटर
- उपयुक्त साठा: ७३.७७ दशलक्ष घनमीटर
- टक्केवारी: ३४.३९% (मागील वर्षी: ७.०८%)
- पाऊस: २७१ मिमी

### भामा आसखेड धरण

- एकूण पाणीपातळी: ६५८.९२ दशलक्ष घनमीटर
- एकूण साठा: ८२.२९ दशलक्ष घनमीटर
- उपयुक्त साठा: ६८.७७ दशलक्ष घनमीटर
- टक्केवारी: २९.७६% (मागील वर्षी: ३१.६८%)
- पाऊस: १६८ मिमी

### कळमोडी धरण

- एकूण पाणीपातळी: ६८५.९८ दशलक्ष घनमीटर
- एकूण साठा: ४७.७५ दशलक्ष घनमीटर
- उपयुक्त साठा: ४७.७५ दशलक्ष घनमीटर
- टक्केवारी: १००% (मागील वर्षी: १८.९१%)
- पाऊस: ३८३ मिमी

# चाकण परिसरातील वाहतूक कोंडी फुटणार तरी कधी?

## कोणत्याही राजकीय पुढाऱ्याला लक्ष द्यायला वेळ नाही त्यामुळे लोकप्रतिनिधी आहेत तरी कुठे? असा संतप्त सवाल नागरिक विचारात आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

चाकण आणि परिसरात असणाऱ्या कारखानदारीने बेसुमार वाढलेली वाहनांची संख्या, अपुरे रस्ते, सततची वाहतूक कोंडी, बेदरकार वाहनचालक, प्रशासन आणि प्रशासकांची सुरू असलेली गळचेपी भूमिका आणि वाहतूक पोलिसांच्या दुर्लक्षामुळे चाकणच्या मार्गांवर रोज होणाऱ्या जीवघेण्या अपघातात एक तरी बळी जातोय तर एखादा कायमचा जायबंदी होत आहे. मात्र कोणत्याही राजकीय पुढाऱ्याला लक्ष द्यायला वेळ नाही. त्यामुळे मतांसाठी दारोदार फिरणारे लोकप्रतिनिधी आहेत तरी कुठे? असा संतप्त सवाल नागरिक विचारात आहेत.

चाकण शहरातून जाणार्या महामार्गावरील तळेगाव – चाकण,पुणे – नाशिक मार्गासह आंबेठाण रस्ता आणि औद्योगिक क्षेत्रातील प्रत्येक रस्त्यांवर वाहतुक कोंडीचा प्रश्न दररोज भेडसावतो आहे.परंतु,त्यावर तोडगा काढण्यात राजकीय नेते,प्रशासन,पोलिस खात्याला अपयश आले आहे.तास अर्धा तास जागेवर वाहने उभे राहत असल्याने इंधन,वेळ वाया जात आहे.पुणे- नाशिक महामार्गावर तसेच चाकण -तळेगाव, चाकण- शिक्रापूर मार्गावर सातत्याने वाहतूक कोंडी होत आहे. चाकणला वाहतूक कोंडीचे ग्रहण हे लागले आहे. हे ग्रहण काही सुटत नाही अशी भयानक अवस्था आहे. वाहनांच्या अगदी एक, दोन किलोमीटर रांगा लागत आहे. त्यामुळे नागरिक,प्रवाशी,कामगार, विद्यार्थी सारेच संतप्त झाले आहेत.

सकाळ पासूनच पुणे नाशिक महामार्गावर दुतर्फा वाहनांच्या सुमारे एक ते तीन किलोमीटर रांगा लागलेल्या असतात. कोंडीत सापडलेली वाहतूक सुरळीत करताना वाहतूक पोलीस कर्मचारी व त्यांना सहाय्य करणारे ट्राफिक वार्डन यांची तारांबळ उडते . पुणे नाशिक महामार्गावर स्पाईन रोड सिग्नल पासून, मोशी चौक,भारत माता चौक, चिंबळी, मोई फाटा, कुरळी फाटा, स्पायसर चौक, आंबेठाण चौक (संत सावता माळी चौक) वाकी, रोहकल फाटा या चौकात सिग्नलला वाहतुकीच्या लांबच्या लांब रांगा लागलेल्या असतात.



### एलिव्हेटेड कॉरिडॉर कागदावरच

» वाहतुकीची समस्या सोडविण्यासाठी नाशिक फाटा ते चांडोली आणि चाकण ते तळेगाव एलिव्हेटेड कॉरिडॉर म्हणजे दुमजली रस्ता करण्याच्या घोषणा झाल्या आहेत. मात्र, प्रत्यक्षात कामाला सुरुवात कधी होणार आहे.हे कुणी स्पष्ट सांगत नाही. तोपर्यंत वाहतूक कोंडीची समस्या अशीच राहणार का?असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### वाहतूक कोंडी आणि वाहतूक पोलीस

» चाकण आणि औद्योगिक वसाहतील वाहतूक नियमन सुरळीत होण्यासाठी चाकण वाहतूक शाखेतून महाळुंगे वाहतूक शाखा वेगळी करण्यात आली.परंतु वाहतूक कोंडी जैसे थैच राहिली आहे. वाहतूक नियमन करण्यात चाकण आणि महाळुंगे वाहतूक शाखा फेल झाल्या असल्या तरी दंड वसुलीमध्ये एक नंबरवर असल्याचे काही पोलीस कर्मचारी खासगीत बोलून दाखवत आहेत.